ISSN - 0976-5425

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक बाविसावा

ISSUE - XXII




कार्यकारी संपादक

डॉ. सोमनाथ रोडे

Scanned by CamScanner

[illegible] रु. २०००/- दि. 16/10/17
[illegible]

[illegible]
9/12/17


मराठवाडा इतिहास परिषद,

औरंगाबाद

(रजि. नं. एफ ८१० / दि. १६.०८.१९८१)

ISSN : 0976-5425


# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका


| | |
|---|---|
| Issue - XXII | December |
| अंक बाविसावा | 2017 |



कार्यकारी संपादक

**डॉ. सोमनाथ रोडे**

**: संपादकीय मंडळ :**

| | |
|---|---|
| डॉ. रामभाऊ मुटकुळे | डॉ. ओमशिवा लिगाडे |
| डॉ. तुकाराम बोकारे | डॉ. शेख एजाज |
| प्रा. धनराज बंडे | प्रा. संजय पाईकराव |

या अंकात व्यक्त केलेली विचारमते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद तसेच संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Scanned by CamScanner

## गोषवारा


| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रभाकर नारायण शिंदे, प्रा. रवि सुभाषराव सातभाई | संत शिरोमणी नामदेव महाराजांचे भक्ती चळवळीतील योगदान | १२४ |
| २ | सिंधु नियुत्ती लोणकर | मध्ययुगीन दक्षिणेतील सामाजिक जीवन | १२५ |
| ३ | कु. पाईकराव वर्षा मुकींदराव | वाशिम येथील बालाजी मंदीराचे ऐतिहासिक अध्ययन | १२६ |


## आधुनिक विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १ | स्वर्णमाला मस्के | अभिजनवादाच्या मुशीतील स्त्री शिक्षणाचा प्रश्न | १२९ |
| २ | डॉ.सौ. संजीवनी बारहाते | डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील चर्मकार समाजाचे योगदान | १३५ |
| ३ | डॉ. ओ.व्ही. लिगाडे | १९०५ ते १९४७ दरम्यानच्या भारतातील ध्वजपरंपरेचा अभ्यास | १४० |
| ४ | प्रा. धनराज वैजनाथराव बंडे | भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या पार्श्वभूमीवर हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे वेगळेपण | १५१ |
| ५ | डॉ. एजाज एम. शेख | पंडित जवाहरलाल नेहरू यांचे धर्मनिरपेक्ष विचार काळाची गरज | १५६ |
| ६ | Dr. Bina Sengar | Defining And Redefining Political Status Gond Tribe In Maharashtra | १६० |
| ७ | डॉ. प्रशांत सुधाकरराव देशमुख | जालना आणि ब्रिटिश छावणी | १६७ |
| ८ | डॉ. अनिल मुरलीधर कठारे | आंबेडकरी चळवळीतील एक कार्यकर्ते : रामराव पवार | १७२ |
| ९ | सोमनाथ व्यंकटी घाडगे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार | १८२ |
| १० | डॉ. प्रकाश संभाजी वाघमारे | काळाराम मंदिरात 'डॉ. आंबेडकर की जय'ची घोषणा | १८७ |
| ११ | गौतम व्यंकटी घाडगे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाहीविषयक विचार | १९२ |
| १२ | डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी | इतिहासातील संरचनावाद : एक अभ्यास | १९८ |
| १३ | डॉ. विनोद बाबूराव बोरसे, डॉ. व्यंकटेश लांब | म. गांधी यांच्या सविनय कायदेभंग चळवळीतील स्त्रियांचा सहभाग | २०४ |
| १४ | डॉ.सौ. गीतांजली भीमराव बोराडे | हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची ऑनाल्स स्कूलच्या वैचारिक परिप्रेक्षातून केलेली मीमांसा | २०९ |
| १५ | डॉ. नितीन बावळे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समाज संरक्षणाची भूमिका | २१५ |
| १६ | संगमेश्वर देविदास साकोळे | निजामकालीन रेल्वे सुधारणांचा विकास | २१९ |
| १७ | डॉ. अरुण वळवे, गौतम व्यंकटी घाडगे | महात्मा जोतीराव फुले यांचे आर्थिक विचार | २२३ |


Scanned by CamScanner

(७)

# जालना आणि ब्रिटिश छावणी

**डॉ. प्रशांत सुधाकरराव देशमुख**

अ. र.भा. गरुड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी, ता. जामनेर, जि.जळगाव

जालन्याचे स्थान महाराष्ट्राचा मध्यवर्ती जिल्हा म्हणून आहे. जालना हे कुंडलिका नदीच्या काठावर वसलेले गाव आहे. Lat. १९.५.'४२' N आणि Long. ७५°५६' १५" E. इ.स १८८१ ला जालन्यात फक्त ८०० घरे होती [१]. आज प्रशासकीय - जिल्ह्याचे केंद्र जालना आहे. औरंगाबादच्या प्रादेशिक विभागात जालन्याचा समावेश होतो. जालना जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७७१८ km² आहे. जालना जिल्ह्यात ९७० खेडी आहेत. जालन्याच्या उत्तरेला जळगाव, पूर्वेला परभणी आणि बुलढाणा, दक्षिणेला बीड तर पश्चिमेला औरंगाबाद जिल्हा आहे. जालना जिल्ह्याचे भौगोलिक स्थान १९.०१' to २१.०३' N ७५-०४' E आहे [२].

इ.स. २०११ च्या जनगणनेनुसार जालन्याची लोकसंख्या १९,५८,४८३ होती ज्याची घनता २५५ प्रति ५९ km होती तर साक्षरतेचे प्रमाण ७३.६१% होते.

जालना जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरुन गोदावरी नदी वाहते, तर दुधना, गुलाटी, पूर्णा या गोदावरीच्या मुख्य नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात. पूर्णा ही नदी जालना जिल्ह्याच्या मध्य भागातून वाहते. खेळणा आणि गिरजा ह्या पूर्णेच्या उपनद्या होत. आज जालन्याला *The city of sweet limes* असे ओळखण्यात येते [३].

हैद्राबाद संस्थानाच्या काळात जालना येथे १८९५ ला दारुल मजानित या नावाने Mental Hospital ची सुरुवात करण्यात आली. १९५३ ला हा दवाखाना एरागड्डा - हैद्राबाद येथे स्थलांतरित करण्यात आला. देशात असणाऱ्या २१ दवाखान्यांपैकी हा एक प्रसिध्द दवाखाना होता. १९५० ला दारुल मजानिनचे नामकरण Mental Hospital असे करण्यात आले [४].

**२.१ जालना छावणीची स्थापना :**

मराठ्यांचा उत्तर पेशवाईच्या काळातील मराठा सरदार शिंदे यांचा प्रत्यक्ष संबंध जालन्याशी आला. इ.स. १८०३ ला जालन्याचा भाग कर्नल स्टिव्हनसनने जिंकला. शिंदेच्या ताब्यात असणारा जालना ब्रिटिशांनी जिंकून निजामाला दिला. स्टिव्हनसनने जिंकलेला किल्ला आणि प्रदेश ब्रिटिश-निजामाकडे राहिला. शिंदेच्या ताब्यातील किल्ला-प्रदेश आणि विपूल प्रमाणात उपलब्ध जमीन ब्रिटिशांनी ताब्यात घेतली. उत्तम बाजारपेठ, खानदेश-मराठवाडा-विदर्भचा सीमावर्ती भाग आणि जमशेदखानाने पाणी आणि नागरी सुविधा केलेली वस्ती, हे जालन्याचे वैशिष्ट्य होते. जालना


ISSN : 0976 – 5425

Scanned by CamScanner

१८०३ ते १८१८ इ.स. पर्यंत महत्त्वपूर्ण होते. इ.स. १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला. १८२७ ला जालन्यात छावणी ब्रिटिशांची निजामाने स्थापन केली.[५] १८१८ ते १८५२ इ.स या काळात मोठ्या प्रमाणात जालना, औरंगाबादच्या परिसरात विशेषतः जालन्याच्या उत्तरेला अजिंठा औरंगाबादच्या बाजूला गंगापूर-वैजापूर भागात भिल्लांचा उपद्रव-बंड मोठया प्रमाणात झाला. यांचा बिमोड करणे आणि प्रदेश ताब्यात ठेवणे, हा या छावणी स्थापन्यामागचा उद्देश होता. बंडाच्या पारिपत्यात जालना छावणीचे योगदान महत्त्वपूर्ण होते. म्हणूनच जेम्स स्टुअर्ट लिहितो की, "*A Starved peasantry has been Crushed and British blood has split in this bad business* (१८२९)"[६]

**जालना छावणीच्या स्थापने ( १८२७ इ.स ) मागची कारणे :**

१. EIC - निजाम तैनाती फौज करार.

२. १८०३ इ.स आसई युध्द - शिंदेचा पराभव व जालना ताबा.

३. १८१८ इ.स पेशवाईचा पराभव

४. १८१८ ते १८५२ या काळात जालन्याच्या उत्तर भागात झालेले भिल्लांचे उठाव

५. मराठावाडा - खानदेश - विदर्भ यांचा जालना सीमावर्ती भाग.

६. सुरक्षित प्रदेश व विपूल प्रदेश आणि किल्ला.

७. जालन्याच्या वस्तीमध्ये असणाऱ्या सेवा - सुविधा.

८. १८१८ नंतर निजामाला प्राप्त झालेला प्रदेश.

इ.स १८२७ ला जालन्यात छावणी स्थापन करण्यात आली. १८२७ ते १९०३ हा जालन्यातील छावणी काळ इ.स १८६१ ला जालन्याहून सिकंदराबदला छावणी हालविण्यात आली. कुंडलिका ही जालन्यातून वाहणारी मुख्य नदी पावसाळयात खळाळून वाहणारी आणि उन्हाळयात पात्र कोरडे असणारी नदी जालन्यात कादरी संताच्या नावावरुन ओळखला जाणारा भाग कादराबाद. कादराबाद लगत कंपाऊंड होते, भिंत होती. याच भागाच्या उतारावर छावणी होती [७].

इ.स. १८३२ पासून ख्रिस्ती मिशनऱ्यांचे धर्मप्रसाराचे कार्य सुरु झाले. यात अमेरिकन धर्मप्रसाराचे कार्य जालन्यात मोठे होते. त्यांनी १८३२-४१ पर्यंत कार्य केले. डॉ. विल्सन आणि डॉ. नारायण शेषाद्री यांचा उल्लेख विशेषत्वाने करावा लागतो. डॉ. विल्सन आणि डॉ. नारायण शेषाद्री यांनी जालन्याजवळ ३ मैल अंतरावर बेथलहॅम गावाची स्थापना करण्यात आली.[८] त्यांनी पुढाकार घेतला. येशू ख्रिस्ताच्या जीवनाशी निगडित बेथलहॅम प्रमाणे या गावात वसती वसविण्यात आली. १८९६ ला जालन्यात पहिले चर्च स्थापन करण्यात आले [९].

जालन्यातील लष्करी छावणी कादराबाद बाजारपेठाच्या उत्तरेला अर्धामैल अंतरावर - उतारावर दोन मैल पसरलेली होती. याची स्थापना १८२७ इ.स ची होती. सैन्य छावणीचे मुख्यालय हैद्राबाद होते. या छावणीत (जालना येथे) एक अश्वदल, तोफदळ होते. एक स्थानिक अश्वदळ तुकडी,


ISSN : 0976 – 5425

दोन स्थानिक पायदळाच्या तुकडी होत्या. या छावणीचा प्रमुख ब्रिगेडीअर-जनरल होता. यातील एक स्थानिक पायदळ तुकडी इ.स. १८६२ ला कमी करण्यात आली [१०].

या छावणीत ९९३३ रहिवासी यातील ६३४७ हिंदू + १८५ जैन + ३२८९ मुसलमान + ९० ख्रिश्चन+०२२ पार्शी होते. छावणी दक्षिण-पूर्व (South-East) आणि उत्तर - पश्चिम (North -West) दिशेत विस्तारलेली होती. छावणीच्या पाठिमागे सैन्यातील अधिकाऱ्यांची वसाहत होती.

नियोजित उत्तम वसाहत, बगीचा, अतिथीग्रह, पोस्ट ऑफिस, बाजार होता. शिवाय दोन ख्रिश्चन प्रार्थना स्थळे (चर्च) होती. यातील एक फ्री चर्च मिशन होते. याला लागूनच स्कूल होते[११].

डॉ. नारायण शेषाद्री यांनी आपल्या कार्याच्या प्रचाराचे मुख्यालय जालना बनविले. जालन्याजवळ असणारे बेथल हॅम हे त्यांच्या कार्याचे मुख्यालय होते.[१२] इ.स १८२७ ला जालन्यात छावणी स्थापन होण्यापूर्वी एक वर्ष १८२६ इ.स.ला हैद्राबाद संस्थानाच्या लष्करात सुधारणा करण्यात आल्या.

**१. सैन्याचे प्रमुख ठिकाण**

अ) हैद्राबाद - बोलाराम - महादेवपूर आणि मेदक.

ब) औरंगाबाद छावणी कन्नड- जाफ्राबाद.

क) हिंगोली

ड) एलिचपूर (अमरावती )[१३] इ.स. १८२७ ला जालन्यात छावणी स्थापन करण्यात आली.

इ.स. १८२८ स्थानिक अधिकाऱ्यांची भरती बंद करुन EIC तर्फे अधिकारी नियुक्त करण्यात आला. रेसिडेंटला सैन्य अधिकार देण्यात आले.[१४]

इ.स. १८८१ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यात ख्रिश्चन लोकांची संख्या ७३९ होती. यापैकी ३८३ पुरुष आणि ३५६ स्त्रिया होत्या. यापैकी छावणीत १८४ पुरुष + १५९ स्त्रिया होत्या. जालना छावणीत [१५] - खालील प्रमाणे धार्मिक समाज होता.

**तक्ता क्र. ०१**

| धर्म | पु. | स्त्री | एकूण |
|---|---|---|---|
| मुसलमान | १४४४ | १८४५ | ३२८९ |
| ख्रिश्चन | ००३४ | ००५६ | ००९० |
| पार्शी | ००१४ | ०००८ | ००२२ |
| **एकूण** | **४६९१** | **५२४२** | **९९३३** |

हैद्राबादच्या निजामाकडे घोडदळ - २७५०, तोफदळ - ७२५, पायदळ ५७५२ डोंगरभागातील सैनिक १७० असे ९३९७ सैनिक होते. यात लेफ्टनंट कर्नल ०२, मेजर-०४, कॅप्टन कमांडंट - १०, कॅप्टन- ४१, लेफ्टनंट-१३, सर्जन-१३, सहसर्जन-०१ असे ८४ अधिकारी एलिचपूर - औरंगाबाद - मोमीनाबाद (अंबाजोगाई), गुलबर्गा, हिंगोली, बोलाराम, वारंगळ, मकथळ, लिंगातुगूर, हिंगोली, बोलाराम, बुलढाणा येथे कार्यरत होते [१६].


ISSN : 0976 – 5425

निजामाने ब्रिटिशांशी इ.स. १८०० मध्ये करार केल्यानुसार ६००० पायदळ, ९००० घोडदळ, इ. चे साह्य मिळाले. निजामाकडे असणाऱ्या लष्कराची संख्या ७०००० होती यात आफ्रीकन, अरब, रोहिला, राठोड, इ. चा समावेश होता. हे सैन्य अप्रशिक्षित होते. सरदार-नवाब यांच्यातील भरणा झालेले हे सैनिक होते. याचबरोबर अल्प प्रमाणात सैन्यात फ्रेंच-डच- पोर्तुगीज-स्पॅनिश, इत्यादींचाही समावेश होता. इ.स. १८०३ च्या आसई युध्दानंतर निजाम सत्तेला लष्करात सुधारणांची गरज वाटली. दरबारातील वकील किर्क्रपॅट्रिक याने निजामाकडे लष्कर सुधारणाची आवश्यकता व्यक्त केली होती. १८१८ ला मराठा सत्तेच्या अस्तानंतर जालना शिंदेकडून, वैजापूर कन्नड पेशव्यांकडून, वेरुळ-औरंगाबाद अजिंठा होळकरांकडून निजामाला मिळाले. यामुळे या भागातील जालना औरंगाबाद छावणी भक्कम करण्यात आली [१७].

१८२६ ला निजामाने लष्करी छावण्यात बदल केले. सुधारणा केल्या. जुने पद रद्द केले. दलांची नियुक्ती सैन्याचा एक भाग बनवली. जालन्याच्या उत्तर-पूर्व भागात ४ मैल अंतरावर बेथेल ही ख्रिश्चन वस्ती आहे. या भागात १८८१ इ.स. ला ४०० रहिवासी राहत. इ.स.१८६४ ला या वस्तीची स्थापना बेथलहॅम प्रमाणे करण्यात आली. यात रेव्ह. नारायण शेषाद्री (Free Church Father-Scottland) यांनी १००० बिघा जमीन चर्चद्वारा प्राप्त अनुदानातून करण्यात आली. ही जमीन निजामाकडून खरेदी करण्यात आली. यात निवास घरे, चर्च, स्कूल, धर्मशाळाची स्थापना करण्यात आली [१८].

कुंडलिका नदीच्या डाव्या किनाऱ्यावर संत मीर राहावली यांचा दर्गा आहे. इ.स. १८५५ ला याच ठिकाणी रोहिला पठाण आणि कंपनी सैनिक यांच्यात संघर्ष झाला. यात दोन्ही बाजूचे मिळून १०० जणांचा मृत्यू-जखमी झाले. रोहिल्यांना शरणागती पत्करावी लागली [१९].

मराठवाडातील निजामाविरुध्दचे बंड मोडण्यासाठी निजाम-ब्रिटिश सहाय्यक संधीनुसार औरंगाबाद - जालना - अंबाजोगाई आणि हिंगोली येथे ब्रिटिश छावण्यांची स्थापना झाली. जालन्यात छावणीची स्थापना इ.स १८५७ ला झाली. औरंगाबाद जिल्ह्यात झालेल्या बंडाचा बिमोड करण्यासाठी जालना छावणीतील सैन्याला बराच त्रास सहन करावा लागला. इ.स.१८२७, १८५३-५४,१८५७ ब्रिटिश - निजामाविरुध्द बंड मराठवाडयात झाली. इ.स १८६४ ला निजामाचा दिवाण सालारजंग (१८५३-८३) यांनी मराठवाडयातील भाग एकत्र केले.

हैद्राबादच्या निजामाची वाटचाल दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या समाप्तीनंतर स्वतंत्र राहण्याच्या दृष्टीने राहिली. स्वातंत्र्याच्या हस्तातंराच्यावेळी संस्थानातील चळवळीला स्थान होते. मुक्ती संग्रामाचा लढा तीव्र बनत गेला. वाढता विरोध कमी व्हावा. म्हणून निजामाने अनेक जनकल्याणकारी निर्णय घेतले. २१ जून १९४८ ला निजामाने औरंगाबाद जिल्ह्याचे विभाजन करुन जालना-भोकरदन-सिल्लोड-अंबड यांचा जालना जिल्हा घोषित केला.[२०] मौलवी सय्यद उसाफुद्दीन यांची जालना जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. १७ सप्टेंबर १९४८ ला जालना


ISSN : 0976 – 5425

भारता... समाविष्ट होता.

**संदर्भ :-**

१. Gazetteer, 'The Nizam's Dominions', Aurangabad Dist., Bomby, TOI, 1884, Reprint 2006, pp.860 -861.
२. Wikipedia. Jalna Dist.
३. कित्ता.
४. कित्ता.
५. Souvenir, Seed Tach. 2000, State Level Conference, 22-23 oct. 1999, pp.3-8.
६. कित्ता.
७. Burton, R.R. 'A History of Hyderabad Contingent', office of the Superintendent of Gov. Printing, India, Calcutta, 1905 pp. 6-7.
८. Souvinier, op.cit, pp.3 - 8.
९. कित्ता.
१०. Gazetteer of the Nizam's Dominions, op.cit. pp.862-863.
११. कित्ता.
१२. डॉ. रोडे सोमनाथ (संपा), 'निवडक शोध निबंध', अंक नऊ, म.इ.प. औरंगाबाद, पृ.१७४-१७५.
१३. The freedom struggle of Hyderabad (A connected account) Vol.1, 1800-1857, pub. In.1992, .pp.116.
१४. कित्ता.
१५. Gazetteer of the Nizam's Dominions, op.cit. pp.236 -237.
१६. The freedom struggle of Hyderabad ( A connected account) op.cit.pp 04-05.
१७. The freedom struggle of Hyderabad (A connected account) Vol.2, pp.62.
१८. Gazetteer of the Nizam's Dominions, op.cit. pp. 863
१९. कित्ता.
२०. काळे भगवान, 'महाराष्ट्र : काल आणि आज', पृ. ०५-०६.

OOO


ISSN : 0976 – 5425

Scanned by CamScanner